# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक ४५ / २०२५

### कायमस्वरूपी खंडीत केलेली कृषी वीज जोडणी चालू करून देण्याबाबत

अशोक जगदेवाप्पा तमशेट्टी ........................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, सोलापूर (महावितरण) ........................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अशोक जगदेवाप्पा तामशेट्टी

प्रतिवादी :- मनीष सुर्यवंशी, कार्यकारी अभियंता, सोलापूर ग्रामीण

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २२ जुलै २०२५

आदेश पारित दिनांक :- १९ सप्टेंबर २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०20 (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक ७ एप्रिल २०२५ च्या आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ६ जून २०२५ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*"१. तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.*

*२. शेती पंपाच्या वीज देयकामध्ये रु.२२,९४0/- एवढया रक्कमेचे क्रेडीट ऑनलाईन बिल रिवीजन क्र.१६२१४५४७ ने देण्यात आलेले आहे. त्याची प्रत ग्राहकास दयावी तसेच ग्राहकाची सुरक्षाठेव रक्कम रु.3000/- वीजबीलामध्ये दाखवण्यात यावी.*

*3) ग्राहकाची वीजजोडणी कायमस्वरूपी बंद केल्याने महावितरणच्या नियमानुसासर ग्राहकास वीज जोडणी देण्यात यावी."*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २२ जुलै २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक २४ फेब्रुवारी १९७७ पासून ५ एचपी चे शेती ग्राहक (क्रं.३३१५६००५५५९१) होते. वीज जोडणीबाबतची माहिती खालील तक्ता क्रं.१ मध्ये दाखविली आहे.

तक्ता १

| Name of consumer | Address | Consumer No. | Date of supply | Date of PD | Sanctioned load | Ficticious billing withdrawal |
|---|---|---|---|---|---|---|
| Ashok Jagdevappa Tamshetty | G.No.259/257, Bhag Hotgi, Tal. South Solapur | 331560055591 | 24.02.1977 | 01.10.2023 | 5 HP | Rs.22,940/- |

- साधारणतः सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२२ पासून वीज पुरवठा योग्य न झाल्यामुळे अपिलार्थीने सेक्शन कार्यालय होटगी येथे वारंवार तोंडी तक्रारी केल्या. परंतू होटगी कार्यालयाकडून तक्रारीचे निवारण झाले नाही. म्हणून दिनांक २४ मार्च २०२३, ७ एप्रिल २०२३ व ९ मे २०२३ रोजी महावितरणच्या तक्रार नोंद वहीमध्ये तक्रारीं नोंद केल्या. त्यावेळी ट्रान्सफॉर्मर जळाल्याचे सांगण्यात आले. अपिलार्थींची वीज जोडणी एल टी लाईनवर शेवटची असल्याने वीज पुरवठा वारंवार खंडीत होत होता व कमी व्होल्टेज मिळत होते.
- त्यानंतर दिनांक १९ जून २०२३ रोजी वरीष्ठ कार्यालय सोलापूर व ग्राहक सेवा केंद्र महावितरण सोलापूर यांच्याकडे ईमेलद्वारे योग्य वीज पुरवठा मिळण्यासाठी तक्रार दाखल केली. परंतू सदर तक्रारीचे निराकरण झाले नाही. त्यामुळे शेती पंप चालू करणे शक्य होत नव्हते. अपिलार्थीने हताश होऊन वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात यावा अशी विनंती दिनांक २९ ऑगष्ट २०२३ रोजी महावितरणला केली. त्यानंतर महावितरणने दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद केला. दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते दिनांक १ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत अपिलार्थीस वीज पुरवठा करण्यात आला नाही. तथापि, महावितरणने या कालावधीत सरासरी कल्पीत वीज देयके अपिलार्थीस पाठविली. त्यानंतर सुध्दा अपिलार्थीस दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत वीज देयके येत होती.
- वीज पुरवठा सुरळीत होत नाही याची खातरजमा झाल्यानंतर दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी माननीय अध्यक्ष व कार्यकारी संचालक महावितरण यांच्याकडे याबाबत कार्यवाहीसाठी लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतरच वीज देयक दुरुस्तीस महावितरणने सुरुवात केली ही बाब वेदनादायक आहे.

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

- प्रतिवादी शाखा कार्यालयाने दिनांक १० मे २०२४ रोजी ग्राहकाची सविस्तर स्थळतपासणी केली असता सदर अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक १ ऑक्टोबर २०२२ पासून बंद असल्याचे मान्य केले. स्थळतपासणी अहवालानुसार अपिलार्थीचा शेतीपंपाची वीज जोडणी दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी कायमस्वरूपी बंद करण्यात आली हे अधोरेखीत झाले.
- प्रतिवादीने वीज देयकाची दुरुस्ती ही मोबाईल वेबकंसोल मधून आय डी क्रं.६०३९४ ने करण्यात आलेली आहे असे नमुद केले आहे. अपिलार्थीस त्यांच्या वीज देयकामध्ये रु.२२,९४०/- एवढया रक्कमेचे क्रेडीट ऑनलाईन बिल रिवीजन क्र.१६२१४५४७ ने देण्यात आले.
- अपिलार्थीस मार्च २०२४ अखेर रु.७,०८०/- चे क्रेडीट दिलेले असून सदरची रक्कम व सुरक्षा ठेव रु.३,०००/- वरील व्याजाची रक्कम अपिलार्थीस प्राप्त झालेली नाही.
- अपिलार्थीने विनंती केली की,
    - वीजे अभावी अपिलार्थींना २८ महिन्यासाठी त्यांच्या शेतीची पिक घेता आली नाही म्हणून सरासरी रु.८०,०००/- ची नुकसान भरपाई मिळावी.
    - स्टेशनरीचा खर्च, टपाल खर्च, प्रवास खर्च व मानसीक त्रासापोटी रु.१०,०००/- चा खर्च मिळावा.
    - जुनी वीज जोडणी ग्राहक (क्रं.३३१५६००५५५९१) परत चालू करुन देण्यात यावी.

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २२ जुलै २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक २४ फेब्रुवारी १९७७ पासून ५ एचपी चे शेती ग्राहक (क्रं.३३१५६००५५५९१) होते. वीज जोडणीबाबतची माहिती तक्ता क्रं.१ मध्ये दाखविली आहे.
- अपिलार्थीच्या वीज जोडणीला दिनांक १ नोव्हेंबर २०२२ पासून वीज पुरवठा होत नसल्याची व वीज पुरवठा बंद असूनही वीज देयक आकारल्याची तोंडी व लेखी तक्रारी महावितरण कार्यालयाला केल्याचे समजते. तसेच त्याबाबतची तकार दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी महावितरणचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, प्रकाशगड मुंबई यांच्या कार्यालयास केली. सदरहू तक्रार सोलापूर मंडल कार्यालयास दिनांक २८ मार्च २०२४ रोजी प्राप्त झाली, व त्या कार्यालयाने दिनांक ९ मे २०२४ रोजी शाखा कार्यालयास स्थळ तपासणी करण्याचे निर्देश दिले. शाखा कार्यालयाने दिनांक १० मे २०२४ रोजी ग्राहकाची सविस्तर स्थळतपासणी केली असता सदर ग्राहकाचा वीज पुरवठा दोन वर्षे बंद असल्याचे निदर्शनास आले. स्थळतपासणी अहवालानुसार अपिलार्थीचा वीज पुरवठा बंद असले कारणाने व अपिलार्थीच्या दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजी केलेल्या वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत करण्याच्या ईमेलने केलेल्या विनंतीनुसार सदरील शेतीपंपाची वीज जोडणी दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी कायमस्वरूपी बंद करण्यात आली.

- सदर ग्राहकाने त्यांच्या शेतीपंपाचे वीज जोडणी दिनांक १ नोव्हेंबर २०२२ पासून वीज पुरवठा नसल्याचे नमुद केल्याने महावितरण सोलापूर ग्रामीण २ कार्यालयाने खालीलप्रमाणे कल्पीत वीज देयके मागे घेतली (withdrawn) (त्रैमासीक वीज देयके: दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ डिसेंबर २०२३) ती खालील प्रमाणे.

तक्ता २

| Bill Revision for the Quarter Dec. 2022 to Dec. 2023 | |
|---|---|
| Period 1.10.2022 to 31.12.2023 | |
| EC FCA Amount. (17781 + 1150) | 18931.00 |
| ED Amount | 0.00 |
| Other Amount (627.87 + 3001*+334.90) | 4008.77 |
| Total Credit Amount | 22939.77 |
| Note : EC = Electricity Charges, FCA = Fuel Cost Amount,* adjustment of security deposit of Rs. 3001/- | |

- अपिलार्थीची सुरक्षा ठेव रक्कम रु.३,००१/- ही अपिलार्थीच्या थकबाकी रक्कमेतून मधून वजा केलेली आहे. सदर वजावट रक्कम अपिलार्थीस परत करण्याकरींता वरील तक्त्यानुसार नमुद केल्यानुसार गृहीत धरण्यात आलेली आहे. तसेच वीज देयकावर जमा असलेल्या सुरक्षा ठेव रक्कमेवर मार्च २०२३ पर्यंतचे व्याज (महावितरणच्या परिपत्रकानुसार द.सा.द.शे. ४.२५% दराने) अपिलार्थीस देणे केले आहे. तसेच दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ या कालावधीच्या १८३ दिवसाचे व्याज (महावितरणच्या परिपत्रकानुसार द.सा.द.शे. ६.७५% दराने) **रक्कम रु.१०१.५६ अपिलार्थीस देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.**
- सोलापूर ग्रामीण २ कार्यालयाने अपिलार्थीची थकबाकी कमी करण्यासंबधी तयार केलेल्या प्रस्तावास विभागिय कार्यालयाने व सोलापूर मंडल कार्यालयाने दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी मंजूरी दिली होती व त्यानुसार अपिलार्थीच्या शेती पंपाच्या वीज देयकामध्ये रु.२२,९४०/- चे क्रेडीट ऑनलाईन बिल रिविजन ने देण्यात आले होते.
- अपिलार्थीने दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी रु.५,०००/- व दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी रु.२२,०००/- अशी एकूण रु.२७,०००/- चा भरणा केल्याचे निदर्शनास येते. त्यानंतरही अपिलार्थीची रु.१८,८५९.३७ इतकी कायमस्वरुपी थकबाकी डिसेंबर २०२३ अखेर होती. सदर थकबाकीतून दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी रु.३,००१/- सुरक्षा ठेव रक्कम वजा करुन रु.१५,८६२.५३ इतकी थकबाकी अपिलार्थीची आढळून आली.
- अपिलार्थीने मंचाकडे दिनांक २२ ऑगष्ट २०२४ रोजी तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजीच्या आदेशान्वये निर्देश दिले ते परिच्छेद १ मध्ये नमुद केले आहे.
- त्यानंतर वीज देयक दुरुस्ती करण्यात आली व अपिलार्थीस रु.२२,९४०/- चे क्रेडीट देण्यात आले. त्यामुळे अपिलार्थीचे कायमस्वरुपीचे वीज देयकात रु.७,०८०/- (रु.१५,८६० - रु.२२,९४०)

इतके क्रेडीट आले. रु.७,०८०/- रक्कम अपिलार्थीच्या बँक खात्यावर वळती करण्याकरीता अपिलार्थीकडून आवश्यक ती कागदपत्राची मागणी करण्यात आली व त्यानुसार दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी अपिलार्थीच्या बँक खात्यात रु.७,०८०/- जमा करण्यात आली.

- दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजीच्या अपिलार्थीच्या इमेलद्वारे केलेल्या विनंती अर्जानुसार त्याचे शेतीपंप वीज जोडणी दिनांक १ ऑक्टोबर २०२३ खंडीत करण्यात आली. तसेच शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषीपंप" योजने अंर्तगत पारंपारीक कृषीपंपाची जोडणी मुख्य कार्यालयाने बंद केलेली असल्याने सदर वीज जोडणी (मागेल त्याला वीज जोडणी) शक्य नाही. सदर ग्राहकास कृषीपंपाची वीज जोडणी आता शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषीपंप" योजने अंर्तगत अर्ज करूनच घ्यावी लागणार आहे.
- प्रतिवादीने विनंती केली की अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

## विश्लेषण व निर्णय

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थीच्या वीज जोडणीची सविस्तर माहिती तक्ता क्रं.१ मध्ये देण्यात आली आहे.

अपिलार्थीने नमुद केले की, सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२२ पासून वीज पुरवठा योग्य होत नव्हता. म्हणून दिनांक २४ मार्च २०२३, ७ एप्रिल २०२३ व ९ मे २०२३ रोजी महावितरणच्या तक्रार नोंद वहीमध्ये तक्रारीं नोंद केल्या. अपिलार्थीची वीज जोडणी एल टी लाईनवर शेवटची असल्याने वीज पुरवठा वारंवार खंडीत होत होता व कमी व्होल्टेज मिळत होते. अपिलार्थीने हताश होऊन वीज पुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात यावा अशी विनंती दिनांक २९ ऑगष्ट २०२३ रोजी महावितरणला केली. त्यानंतर महावितरणने दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी वीज पुरवठा कायमस्वरूपी बंद केला. दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते दिनांक १ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत अपिलार्थीस वीज पुरवठा करण्यात आला नाही. तथापि, महावितरणने दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत सरासरी कल्पीत वीज देयके अपिलार्थीस पाठविली. प्रतिवादीने वीज देयकाची दुरुस्ती करुन वीज देयकामध्ये रु.२२,९४०/- एवढया रक्कमेचे क्रेडीट देण्यात आले. अपिलार्थीस मार्च २०२४ अखेर रु.७,०८०/- चे क्रेडीट दिलेले असून सदरची रक्कम व सुरक्षा ठेव रु.३,०००/- वरील व्याजाची रक्कम अपिलार्थीस प्राप्त झालेली नाही. वीजे अभावी अपिलार्थींना २८ महिन्यासाठी त्यांच्या शेतीची पिक घेता आली नाही म्हणून सरासरी रु.८०,०००/- ची नुकसान भरपाई, स्टेशनरीचा खर्च, टपाल खर्च, प्रवास खर्च व मानसीक त्रासापोटी रु.१०,०००/- चा खर्च मिळावा, व जुनी वीज जोडणी ग्राहक (क्रं.३३१५६००५५५९१) परत चालू करून देण्यात यावी.

६. प्रतिवादीने नमुद केले की, शाखा कार्यालयाने दिनांक १० मे २०२४ रोजी ग्राहकाची सविस्तर स्थळतपासणी केली असता सदर ग्राहकाचा वीज पुरवठा दिनांक १ नोव्हेंबर २०२२ पासून ते दिनांक १

ऑक्टोबर २०२३ पर्यंत (कायमस्वरूपी बंद करणेपर्यंत) बंद असल्याचे निदर्शनास आले. अपिलार्थीचे वीज देयक तक्ता २ प्रमाणे दुरुस्त करून सुरक्षा ठेव रक्कम रु.३,००१/- चे समायोजन करून रु.२२,९४०/- चे क्रेडीट देण्यात आले. त्यामुळे अपिलार्थीचे कायमस्वरूपीचे वीज देयकात रु.७,०८०/- (रु.१५,८६० - रु.२२,९४०) इतके क्रेडीट आले. रु.७,०८०/- रक्कम अपिलार्थीच्या बँक खात्यावर वळती करण्याकरीता अपिलार्थीकडून आवश्यक ती कागदपत्राची मागणी करण्यात आली व त्यानुसार दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी अपिलार्थीच्या बँक खात्यात रु.७,०८०/- जमा करण्यात आली. अपिलार्थीच्या दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजीच्या अपिलार्थीच्या इमेलद्वारे केलेल्या विनंती अर्जानुसार त्याचे शेतीपंप वीज जोडणी दिनांक १ ऑक्टोबर २०२३ खंडीत करण्यात आली तसेच शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषीपंप" योजने अंतर्गत पारंपारीक कृषीपंपाची जोडणी मुख्य कार्यालयाने बंद केलेली असल्याने "मागेल त्याला वीज जोडणी" शक्य नाही. सदर ग्राहकास कृषीपंपाची वीज जोडणी आता शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषीपंप" योजने अंर्तगत अर्ज करूनच घ्यावी लागणार आहे.

७. वरील अभिवेदनाचा विचार करता अपिलार्थीचे वीज देयक हे दुरुस्त करून देण्यात आले आहे. त्यात सुरक्षा ठेव रक्कम रु.३,००१/- चे सुध्दा समायोजन करण्यात आले आहे. त्यामुळे अपिलार्थीचे कायमस्वरूपीचे वीज देयकात रु.७,०८०/- (रु.१५,८६० - रु.२२,९४०) इतके क्रेडीट दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी अपिलार्थीच्या बँक खात्यात रु.७,०८०/- जमा करण्यात आली असे निदर्शनात येते.

८. अपिलार्थीने वीजे अभावी नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. मात्र अप्रत्यक्ष नुकसान भरुन देण्याची कोणतीही तरतूद (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) विनियमात नाही. या संदर्भात विनियम क्र.२०.४ (इ) ची तरतूद लक्षात घेणे गरजेचे आहे, ती खालील प्रमाणेः

*"२०.४ (इ) ग्राहकाने सहन केलेल्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीकरीता तो (विद्युत लोकपाल) निवाडा देईल ती रक्कम भरपाई म्हणून तक्रारदाराला अदा करण्याचा निर्देश; आणि / किंवा*

*परंतू तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष, परिणामस्वरुप, आनुषंगिक, दंडात्मक किवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही; "*

९. वरील विनियमाचा विचार करता अपिलार्थीची नुकसान भरपाईची मागणी मंजूर करता येणार नाही. अपिलार्थीच्या वीज देयकाची योग्य ती दुरुस्ती झाली आहे. शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषीपंप" योजने अंर्तगत पारंपारीक कृषीपंपाची जोडणी मुख्य कार्यालयाने बंद केलेली असल्याने आता शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषीपंप" योजने अंर्तगत अर्ज करूनच घ्यावी लागेल, तसेच अपिलार्थीची जुनी वीज जोडणी चालू करता येणार नाही

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

१०.  सदर अभिवेनाबाबत सर्व बाबींचा उहापोह करून मंचाने योग्य तो निर्णय दिला आहे. अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर करण्यात येत आहे. तथापि, अपिलार्थीचे गाऱ्हाणे वेळेत निराकरण न केल्यामुळे महावितरणला रु.२०००/- दंड आकारण्यात येत आहे व दंडाची रक्कम अपिलार्थीस देण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

११.  प्रतिवादीने आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात अनुपालन अहवाल सादर करावा.

१२.  अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. डी. एम. डुंबरे
सचिव
म.वि.नि.आ.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)